Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य./उ.मा./परीक्षा/3609
दिनांक :- 28/11/2024

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या परीक्षेच्या प्रमाणपत्र वाटप करणेबाबत...**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ प्रमाणपत्र संबंधित वितरण केंद्रावर बुधवार दि.04/12/2024 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 4.00 पर्यंत हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे.

***<u>प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यानंतर करावयाची कार्यवाही</u>***

1. प्रथमत: आपणास प्राप्त झालेल्या सर्व प्रमाणपत्र आपल्याच माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या माध्यमिक शाळेच्या एखाद्या विद्यार्थ्याची प्रमाणपत्र प्राप्त न झालेस मंडळ कार्यालयास दि.06/01/2025 अखेर लेखी कळविण्यात यावे. तद्नंतर प्राप्त तक्रारींचा विचार केला जाणार नाही.
2. प्रमाणपत्रे विद्यार्थ्याना हस्तपोहोच देण्यापूर्वी प्रमाणपत्राच्या पाठीमागे असलेल्या रकान्यात आपल्या शाळेचा शिक्का तथा मुख्याद्यापक यांची स्वाक्षरी होऊनच प्रमाणपत्र निर्गमित होईल, हे कटाक्षाने पाहावे. प्रमाणपत्राचा गैरवापर होऊ नये याअनुषंगाने प्रमाणपत्र प्रत्यक्ष विद्यार्थ्याच्या हाती जाईल याची दक्षता घ्यावी. प्रमाणपत्र वितरित केल्यानंतर ते प्राप्त झाल्याबाबत प्रत्येक विद्यार्थ्याची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरीची यादी तारखेसह आपल्या दप्तरी अभिलेखाच्या स्वरुपात काळजीपूर्वक जतन करुन ठेवण्यात यावे.
3. सर्व प्रमाणपत्रावर मा.विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. त्याचबरोबर प्रमाणपत्रावरील नोंदी उदा.विद्यार्थ्यांचे नाव, नावाचे स्पेलिंग व विषय इ. माहिती माध्यमिक शाळेच्या अभिलेखावरुन बिनचूक तपासण्यात याव्यात. त्यानंतरच विद्यार्थ्यास प्रमाणपत्र वितरीत करण्यात यावी.
4. प्रमाणपत्रामध्ये काही त्रूटी असल्यास दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव प्रमाणपत्र मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत (दि.03/01/2025 अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत-

अ) माध्यामिक शाळेच्या मुख्याध्यापकांचे शिफारस पत्र जोडणे आवश्यक आहे.

ब) प्रती प्रमाणपत्रातील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.200/- आणि नवीन प्रमाणपत्रासाठी रु.200/- असे एकूण रु.400/- शुल्क भरावे लागेल.

क) माध्यमिक शाळेच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाच्या छायांकित प्रतीवर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची मुळ स्वाक्षरी व शिक्कयाची प्रत तसेच फॉर्म नं 1 व 2 (डिक्लेरेशन फॉर्म) सादर करावा.

ड) दुरुस्ती यापूर्वीच म्हणजेच प्रिलिस्ट व प्रवेशपत्रे प्राप्त झाल्यानंतर का कळविली नाही याबाबत संबंधित मुख्याध्यापक व लिपिक यांचा मा.विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा. आपल्या माध्यमिक शाळा मार्फत प्रमाणपत्र दुरुस्तीचे परिपूर्ण प्रस्ताव विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या माध्यमिक शाळेची राहील याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर